कोटेशन

क्र. जजीरु/खरेदी विभाग/$O_2$ Cylinder/Qut/ ४६१६-20 /२०२६
अधिष्ठाता कार्यालय,
सर जे. जे. रुग्णालय समूह, मुंबई
दिनांक : ३० / ०७ / २०२६

प्रति,
मेसर्स ______________________
______________________

विषय : सर जे. जे. रुग्णालय समूह, मुंबई येथील विविध विभागांसाठी Medical Oxygen Cylinder दर कराराद्वारे (Rate Contract) खरेदीबाबत.

महोदय,

या रुग्णालयासाठी खाली नमूद केलेल्या साहित्याच्या पुरवठ्यासाठी आपल्याकडून **सीलबंद दरपत्रक** (Quotation) मागविण्यात येत आहे. आपले सीलबंद दरपत्रक या कार्यालयात **दि.** १२/०८/२०२६ **रोजी किंवा त्यापूर्वी** प्राप्त होणे आवश्यक आहे.

खाली नमूद केलेल्या तपशीलानुसारच दर नमूद करावेत. नमूद केलेल्या तपशीलापेक्षा भिन्न असलेले दर विचारात घेतले जाणार नाहीत. कृपया आपल्या दरपत्रकात **उत्पादनाचा कमाल किरकोळ विक्री दर** (MRP), **लागू असल्यास जुना दरकरार** (Old RC Rate) **तसेच शासन रुग्णालय / बृहन्मुंबई महानगरपालिका / इतर शासकीय संस्थांना** (GST सहित) **पुरवठा करण्यात येणारा दर व त्यासंबंधीची कागदपत्रे** जोडावीत.

तसेच लिफाफ्यावर या कार्यालयाचा संदर्भ क्रमांक व अंतिम दिनांक स्पष्टपणे नमूद करावा.

| Sr. No. | Name of Instrument / Equipment's | Required Qut. | Specification | Cost Per Unit (including GST) | Total Cost (including GST) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Medical Oxygen **Cylinder** | 53 | 1320 ML | | |

**अटी व शर्ती**

1 **वाहतूक (Forwarding):** मालाची वाहतूक विनामूल्य (Free on Road Destination) करून संबंधित ठिकाणी थेट (Door Delivery) पुरवठा करावा.

2 **पुरवठा कालावधी:** खरेदी आदेश प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त **०६ आठवड्यांच्या** आत संबंधित प्राप्तकर्त्यास मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

3 **प्रेषणपूर्व तपासणी (Pre-Dispatch Inspection):** निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे पुरवठादाराने प्रेषणपूर्व तपासणीची व्यवस्था करावी. तपासणीचा संपूर्ण खर्च पुरवठादाराने करावा. समाधानकारक तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच साहित्य पाठवावे.

4 **जोखीम खरेदी अट (Risk Purchase Clause):** पुरवठादाराने निर्धारित कालावधीत साहित्याचा पुरवठा न केल्यास खरेदी आदेश आपोआप रद्द करण्यात येईल. अशा परिस्थितीत अधिष्ठाता, सर जे. जे. रुग्णालय समूह, मुंबई यांना इतर स्त्रोताकडून साहित्य खरेदी करण्याचा अधिकार राहील. या खरेदीमुळे झालेला अतिरिक्त खर्च संबंधित पुरवठादाराकडून वसूल करण्यात येईल.

5 **देयक अटी (Payment Terms):** साहित्याचा पुरवठा, यशस्वी प्रतिष्ठापन (Installation), कार्यान्वयन (Commissioning) व समाधानकारक कार्यानंतर करार मूल्याच्या **१००% रकमेचे देयक ८ आठवड्यांच्या आत** अदा करण्यात येईल.

6 **स्वीकार व प्राप्ती (Acceptance & Receipt):** संबंधित खरेदी प्राधिकरणास विहित नमुन्यात स्वीकार व प्राप्ती प्रमाणपत्र सादर करावे.

7 **वितरण चलन (Delivery Challan):** प्राप्तकर्त्याच्या (Consignee) नावाने दोन प्रतींमध्ये सादर करावे. त्यामध्ये साहित्याचे नाव, उत्पादकाचे नाव, पॅकिंगचा तपशील व प्रमाण नमूद असावे.

8 **बील (Invoice):** अधिष्ठाता, सर जे. जे. रुग्णालय समूह, मुंबई (खरेदी कक्ष) यांच्या नावे तीन प्रतींमध्ये सादर करावे. तसेच आयात असल्यास **Bill of Entry** व **Country of Origin Certificate** जोडणे आवश्यक राहील.

9 इतर अटी

**(अ) हमी (Warranty):** पुरवठा केलेल्या सर्व उपकरणांवर कार्यान्वयनाच्या दिनांकापासून **२ वर्षांची हमी** राहील. हमी कालावधी पूर्ण झाल्यानंतर पुढील **८ वर्षे सुटे भाग व सेवा उपलब्ध करून देण्याची लेखी हमी** उत्पादक/पुरवठादाराने द्यावी. हमी कालावधीत उपकरणाची **९५% कार्यक्षम उपलब्धता (Uptime)** राखणे बंधनकारक राहील. उपकरण बंद पडल्यास मुंबईसाठी **२४ तासांत** व इतर ठिकाणांसाठी **४८ तासांत** दुरुस्ती करणे आवश्यक राहील. विलंब झाल्यास खरेदी किमतीच्या **०.०७% प्रति दिवस** दंड आकारण्यात येईल. हा दंड सुरक्षा ठेव (Security Deposit) मधून वसूल करण्यात येईल. उपकरणाच्या उत्पादन दोषामुळे हमी कालावधीत आवश्यक असलेले सर्व सुटे भाग विनामूल्य बदलून देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

**(ब) सर्वसमावेशक देखभाल करार** (Comprehensive Maintenance Contract - CMC): दोन वर्षांचा हमी कालावधी पूर्ण झाल्यानंतर पुढील **८ वर्षांसाठी आदेश मूल्याच्या (कर वगळून) ५% दराने** वार्षिक CMC करण्यात येईल. CMC च्या अटींचे पालन न केल्यास संबंधित पुरवठादारावर दंडात्मक अथवा इतर योग्य कारवाई करण्यात येईल. समाधानकारक कार्यप्रदर्शन अहवाल प्राप्त झाल्यानंतर CMC चे वार्षिक देयक अदा करण्यात येईल.

10 **करारनामा (Contract Agreement):** यशस्वी निविदाधारकाने आवश्यक मूल्याच्या मुद्रांकित (Non-Judicial Stamp Paper) कागदावर करारनामा सादर करणे आवश्यक राहील. किंमत संरक्षण अट (Fall Clause) करार कालावधीत पुरवठादाराने या करारानुसार आकारलेला दर हा त्याच कालावधीत इतर कोणत्याही ग्राहकास आकारलेल्या सर्वात कमी दरापेक्षा जास्त नसावा. जर करार कालावधीत बाजारभाव किंवा पुरवठादाराचा दर कमी झाला, तर त्याची तात्काळ माहिती या कार्यालयास देणे आवश्यक राहील, जेणेकरून पुढील पुरवठ्यासाठी करारातील दर त्यानुसार सुधारित करता येतील.

**अधिष्ठाता**
**सर जे. जे. रुग्णालय समूह, मुंबई**

सूचना

१. दरपत्रके कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सायंकाळी **५.०० वाजेपर्यंत** स्वीकारण्यात येतील.
२. सर्व अटी व शर्ती तसेच साहित्य पुरवठ्याचा कालावधी दरपत्रकात स्पष्टपणे नमूद करावा.